# *वार्तापत्र*

कार्यालय पोलीस अधिक्षक
दिनांकः- १९/०१/२०१७

## *<u>रेगडी परिसरातील विद्यार्थ्यांना मिळणार ई-लर्निंगद्वारे शिक्षण</u>*

आधुनिक तंत्रज्ञान व स्पर्धेच्या युगामध्ये जिल्हयातील दुर्गम व नक्षल प्रभावित भागामध्ये अध्यापन व अध्ययनाचे कार्य अधिक प्रभावीरित्या व्हावे, बदलत्या परिस्थिती व काळानुसार अध्यापन पध्दतीत बदल करता यावे, तसेच या भागातील विद्यार्थ्यांना सुध्दा इतर प्रगत जिल्हयातील विद्यार्थ्यांशी सर्व क्षेत्रात स्पर्धा करता यावी, या उद्देशातून गडचिरोली जिल्हा पोलीस विभाग व आदर्श मित्र मंडळ, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हयाचे अतिदुर्गम रेगडी येथे ज्ञानगंगा प्रोजेक्ट अंतर्गत ई-लर्निंग कार्यक्रमाचे उद्‌घाटन करण्यात आले.

आज रेगडी येथील शासकीय माध्यमीक आश्रमशाळेत आयोजीत कार्यक्रमाचे उद्‌घाटन परि. उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. रणजीत पाटील यांनी तर अध्यक्षता गडचिरोलीचे उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. सागर कवडे यांनी केली. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून उदय जगताप, अध्यक्ष आदर्श मित्र मंडळ पुणे, ॲड. कल्याण शिंदे, नवनीत देशपांडे, अभिजीत सोनवणे, पोउपनि जयसिंग राजपूत, किशोर मेढे, पवन इंगळे, बिराजदार, शास. आश्रमशाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती महल्ले, मंडल व साखरे प्रामुख्याने उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान श्री. नवनित देशपांडे यांनी रेगडी येथील सर्व शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक व विद्यार्थ्यांना ई-लर्निंगबाबत मार्गदर्शन करून प्रात्याक्षिक करून दाखविले. त्यानंतर सदर ई-लर्निंगचे संपूर्ण उपकरण संबंधित मुख्याध्यापकांना अतिर्थीच्या हस्ते अधिग्रहीत करण्यात आले. उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. कवडे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना लोकशाही व नक्षलवाद यातील फरक स्पष्ट करून नक्षलवादयांचे उच्चाटन करण्यासाठी सर्वांनी उच्च शिक्षण घेऊन सामोरे जाण्याचे व

जिल्हा विकासात हातभार लावण्याचे आवाहन केले. आभार प्रदर्शन पोउपनि बांगर यांनी केले. कार्यक्रमाला रेगडीचे प्रतिष्ठीत नागरीक, सर्व शाळेतील शिक्षक व विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.



